दैनिक

# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## आणीबाणीच्या ५१ वर्षांवरून पंतप्रधान मोदींची काँग्रेसवर टीका

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणीबाणीच्या ५१ व्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर, हा काळ भारताच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म '' (ट्विटर) वर पोस्ट करत त्यांनी आणीबाणीच्या काळात लोकशाही मूल्यांचे रक्षण करणाऱ्या सर्व नागरिकांना आणि नेत्यांना आदरांजली वाहिली. तसेच, हा दिवस 'संविधान हत्या दिन' म्हणून अधोरेखित केला आहे. पंतप्रधान मोदींनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, १९७५ मध्ये लागू करण्यात आलेली आणीबाणी हा भारताच्या राज्यघटनेवर झालेला थेट आणि क्रूर हल्ला होता. या काळात नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणली गेली, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्यात आली आणि विरोधी पक्षांचे नेते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांना विनाकारण तुरुंगात डांबण्यात आले. लोकशाहीचा कणा असणाऱ्या न्यायव्यवस्था आणि प्रसारमाध्यमांसारख्या महत्त्वाच्या संस्थांवर या काळात मोठा आघात झाला होता. पंतप्रधानांनी आणीबाणीच्या काळोखातही लोकशाहीचा दिवा तेवत ठेवणाऱ्या सामान्य नागरिकांच्या धैर्याचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, ''या भीषण संकटाच्या काळातही देशातील असंख्य नागरिकांनी अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी शांत बसण्यास नकार दिला आणि संविधानाने दिलेल्या मूल्यांचे रक्षण केले. हे नागरिक आपल्या लोकशाहीचे खरे रक्षक आहेत.'' पंतप्रधानांनी पुढे नमूद केले की, आपली राज्यघटना ही केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षा, हक्क आणि कर्तव्यांचे प्रतीक आहे. सरकार संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे. संविधानाच्या मूळ भावनेनुसार चालत भारत देश न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांवर पुढे जाईल आणि एक मजबूत राष्ट्र बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

(वर्ष ६५ वे अंक १६४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.२६ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# व्हेनेझुएलात दोन शक्तिशाली भूकंप

## इमारती पत्त्यासारख्या कोसळल्या, १० हजार लोकांचा मृत्यू झाल्याची भीती

कराकास दि.२५ (वृत्तसंस्था)- दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएलाची राजधानी कराकाससह देशातील अनेक राज्यांना बुधवारी संध्याकाळी लागोपाठ बसलेल्या दोन विनाशकारी भूकंपाच्या धक्क्यांनी हादरवून सोडले. काही सेकंदांच्या अंतराने आलेल्या या महाभूकंपामुळे अनेक इमारती पत्त्यांसारख्या कोसळल्या असून, मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अमेरिकन भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार, या आपत्तीमध्ये मृतांचा आकडा १० हजारांच्या पार जाण्याची ४४ टक्के, तर १ लाखांपेक्षा जास्त जाण्याची ३० टक्के शक्यता आहे.

स्थानिक वेळेनुसार बुधवारी संध्याकाळी ६:०४ वाजता पहिला धक्का बसला, ज्याची तीव्रता ७.२ रिश्टर स्केल इतकी होती. याचा केंद्रबिंदू कराकासपासून पश्चिमेला १६० किलोमीटर अंतरावरील मोंटाल बान भागात, जमिनीखाली १३ किलोमीटर खोलीवर होता. यानंतर काही मिनिटांत ७.५ तीव्रतेचा दुसरा अधिक शक्तिशाली धक्का बसला. या दुसऱ्या भूकंपाचा केंद्रबिंदू मोरोन शहराच्या नैऋत्येला जमिनीखाली १० किलोमीटर खोलीवर होता.

भूकंप आला तेव्हा व्हेनेझुएलामध्ये सार्वजनिक सुट्टी होती. त्यामुळे बरेच नागरिक आपल्या घरांमध्येच होते. अचानक आलेल्या या संकटामुळे लोकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आणि लोक जीव वाचवण्यासाठी घराबाहेर रस्त्यांवर धावले. या भीषण भूकंपामुळे राजधानी कराकास येथील विमानतळाच्या छताचा काही भाग कोसळला. सोशल मीडियावरील व्हिडिओंमध्ये अनेक इमारतींना मोठमोठे तडे गेल्याचे, तर काही इमारती पूर्णपणे भुईसपाट झाल्याचे दिसत आहे. या भूकंपाचे धक्के शेजारील देश कोलंबियाची राजधानी बोगोटापर्यंत जाणवले.

व्हेनेझुएलाचे गृह मंत्री डियोसदादो काबेलो यांनी जनतेशी संवाद साधत तातडीने घरे खाली करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, भूकंपाची तीव्रता ७ रिश्टर स्केलपेक्षा कितीतरी अधिक होती. याचा प्रभाव त्रूझिलो, याराकुई, काराबोबो, अरागुआ,



मिरांडा, कराकास आणि ला गुआइरा या राज्यांमध्ये तीव्रतेने जाणवला आहे. राजधानीतील पालोस ग्रांदेस आणि अल्तामीरा या भागांना याचा सर्वाधिक फटका बसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

व्हेनेझुएलाच्या इतिहासातील गेल्या १०० वर्षांतील हा सर्वात मोठा आणि विनाशकारी भूकंप ठरला आहे. यापूर्वी १९०० मध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला होता. अमेरिकेने इशारा दिला आहे की, या धक्क्यानंतर अजूनही तीव्र आफ्टरशॉक्स येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, भूकंपामुळे जमिनी खचण्याचा आणि भूस्खलनाचा धोका वाढला आहे.

## खा.संजय दिना पाटलांची पत्रकारांना परत आला तर मारून पाठवेन, शिवीगाळ करत उघड धमकी

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- उद्धव ठाकरे गटातून निवडून आल्यानंतर त्यांची साथ सोडून शिंदे सेनेत सामील झालेले ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांना आता पत्रकारांचे प्रश्नही बोचू लागले आहेत. राजकीय प्रश्नांवर प्रतिक्रिया विचारणाऱ्या पत्रकारांना संजय दिना पाटील यांनी गुरुवारी शिवीगाळ केली. तुम्ही परत इकडे आलात तर मी तुम्हाला मारुन पाठवेन. हे कॅमेऱ्यात रेकॉर्ड करा, तुम्ही उगाच माझ्या गां** बोटं घालताय, परत आलात तर मारुन पाठवेन. हे मी तुम्हाला पोलिसांसमोर सांगतोय, तुम्हाला करायचंय ते करा, अशी अरेरावीची भाषा संजय दिना पाटील यांनी वापरली.

काही दिवसांपूर्वीच ठाकरे गटाच्या नेत्यांना प्रत्युत्तर देताना संजय दिना पाटील यांनी, माझ्या वाट्याला जाणाऱ्यांना मी एकतर हॉस्पिटलमध्ये पाठवेन नाहीतर स्मशानात पाठवेन. आमच्या घराण्यात आम्ही एकेकाळी पाच लोकांचे खून पाडलेत, अशी फुशारकी मारली होती. त्यावरुन ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पोलीस आयुक्तांना पत्र पाठवून दिना पाटील यांच्यावर कारवाईची मागणी केली होती. यावर प्रतिक्रिया विचारण्यासाठी गेलेल्या पत्रकारांना संजय दिना पाटील यांनी शिवीगाळ केली. यावेळी पत्रकारांनी त्यांना त्यांची मुलगी आणि ठाकरे गटाची नगरसेविका राजुल पाटील यांच्याविषयी प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. परखड प्रश्न विचारणाऱ्यांना पत्रकारांसोबत संजय दिना पाटील यांनी गैरवर्तन केले. मी जे बोललोय ते खुलेआम बोललोय, माझ्यावर काय कारवाई करायची असेल तरी पोलीस करतील, मी कारवाई आणि चौकशीला तयार आहे, असे संजय दिना पाटील यांनी छाती ठोकून सांगितले. यावेळी संजय दिना पाटील हे प्रसारमाध्यमांवरही संतापले. तुम्ही माईक माज्या तोंडासमोर कशाला ठरता, आता तुम्ही तिकडे जाऊन आलात ना, मग इकडे येता, कशाला हे सगळं करताय, असे बोलताना संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना शिवीगाळ केली.

माझा शिवसैनिकांसोबत कोणताही वाद नाही, काँग्रेस आणि राष्ट्रवादीचेही माझ्यावर उपकार आहेत. त्यांच्यामुळे मी खासदार झालो. जे नेते माझ्याविरोधात बोलत आहे, ते स्वत:ची सुरक्षा सोडून इकडे काही करायला येणार आहेत का? हे काही करणार, तेव्हा आम्ही मार खाऊन घ्यायचा का? हे लोक स्वत:च्या दादा लोकांकडून फोन करतात, सिक्युरिटीसाठी, ती केस पण दाबून टाकली. ती केस काढायला सांगा ना. मी संजय राऊत यांना खूप मानसन्मान दिलाय. २००४ मध्ये शिवसेनेच्या लीलाधार डाके यांच्याविरोधात मी निवडून आलो तेव्हा संजय राऊत यांनी मला मदत केली. किरीट सोमय्या यांच्याविरोधातही त्यांनी मला मदत केली होती. ही शिवसेनेविरोधात गद्दारी नव्हती का? मी आम्ही पाच लोकं मारली, जे बोललो ती घटना माझ्या जन्मापूर्वीची आहे. मला दहा लोकं लागत नाहीत, मी लोकांच्या मनावर राज्य करतो. शिंदे साहेबांनी माझ्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली नाही, उलट मला शाबासकी दिली. मी मर्द लोकांबरोबर गेलो आहे, मर्दांची कदर करतात, ते नाराजी व्यक्त करत नाहीत, शिंदे साहेबांनी मला शाबासकी दिली आहे, असे संजय दिना पाटील यांनी म्हटले.

## प्रशासनाच्या हलगर्जीपणाची शिक्षा शेतकऱ्यांना का?-कैलास पाटील

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- भरणे मामा, महाराष्ट्र तुम्हाला मामा म्हणतो, पण शेतकऱ्यांना मामा बनवू नका, अशा शब्दांत शिवसेना ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना टोला लगावला आहे. विधानसभेत बोलताना त्यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला होता, यावेळी त्यांनी कृषिमंत्र्यांवर टीका केली आहे. तसेच प्रशासनाच्या हलगर्जीपणाची शिक्षा शेतकऱ्यांना का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

आमदार कैलास पाटील यांनी ट्विट करत म्हटले की, शेतकरी कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ हौसेने घेत नाही. गरज असल्यामुळे तो अर्ज करतो. कृषी यांत्रिकीकरण योजनेत लाखो शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने अर्ज केले. मात्र ज्या दिवशी लाभार्थ्यांची लॉटरी जाहीर झाली, त्याच दिवशी त्रुटी पूर्तीसाठी आवश्यक असलेली वेबसाईट बंद होती. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्रे अपलोड करता आली नाहीत.

वेबसाईट उपलब्ध नसताना त्रुटीची पूर्तता करायची कशी? प्रशासनाच्या हलगर्जीपणाची शिक्षा शेतकऱ्यांना का? असा सवाल कैलास पाटील यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, अखेर याच कारणावरून तब्बल ९४ टक्के अर्ज रद्द करण्यात आले. हा शेतकऱ्यांवर झालेला अन्याय असून सरकारने स्वतःची चूक शेतकऱ्यांच्या माथी मारली, असा आरोप पाटील यांनी केला आहे.

## संजय दिना पाटलांच्या पत्रकारांना धमकी-शिवीगाळ प्रकरणाचे अधिवेशनात पडसाद; मुख्यमंत्र्यांकडून नाराजीसह थेट इशारा

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी पत्रकारांना कथित धमकी आणि शिवीगाळ केल्याच्या प्रकरणाचे पडसाद सभागृहात उमटले. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी हा मुद्दा उपस्थित करत खासदार संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याचा निषेध केला. पत्रकारांना धमकी देणे आणि अरेरावीची भाषा वापरणे लोकशाहीसाठी घातक असल्याचे सांगत संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी त्यांनी सभागृहात केली.

तसेच, मुंबई लोकलमध्ये प्रवाशाची झालेल्या निर्घृण हत्येच्या घटनेवरून नाना पटोले यांनी, ''धावत्या ट्रेनमध्येही जनता सुरक्षित नसेल तर गृहखाते काय करतंय?'' असा सवाल करत सरकारवर तीव्र संताप व्यक्त केला.

खासदार संजय दिना पाटील यांच्या वादग्रस्त विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा झाली असून मुख्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी संजय दिना पाटील यांच्या वक्तव्यवरून नाराजी तर व्यक्त केलीच, त्याचसोबत या बैठकीत त्यांनी शिवसेनेच्या नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या वक्तव्यांचा पाढा वाचत, महायुतीत हे खपवून घेतले जाणर नाही, असा इशाराही दिल्याचे समजते.

देवेंद्र फडणवीस यांनी अर्वाच्य भाषेत बोलणाऱ्या खासदाराला कठोर तंबी द्या, अशा सूचना एकनाथ शिंदे यांना दिल्या आहेत. सरकारची प्रतिमा मलिन करणाऱ्या गोष्टी खपवून घेतल्या जाणार नाहीत, असा इशाराही त्यांनी शिंदेंना दिल्याची माहिती आहे.

तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माफी मागण्यास सांगितल्याचे समजत आहे. माध्यमांशी बोलताना शिंदे म्हणाले, संजय दिना पाटील यांनी केलेल्या वक्तव्याची मी माहिती घेतली आहे. त्यांच्याशी माझी चर्चा झाली. त्यांनी स्पष्ट सांगितले आहे की, पत्रकारांबद्दल कोणतेही अपशब्द वापरण्याचा किंवा त्यांच्या भावना दुखावण्याचा त्यांचा हेतू नव्हता. पत्रकारांशी माझे नेहमी चांगले संबंध राहिले आहेत, असे त्यांनी मला सांगितले. मात्र सातत्याने काही लोक माध्यमांसमोर अत्यंत अर्वाच्य आणि खालच्या दर्जाची भाषा वापरत असल्याबद्दल संजय दिना पाटील यांनी माझ्याकडे व्यथा बोलून दाखवली. त्याचा राग त्यांच्या मनात आहे. तसेच आपल्याकडून काही चुकीचे शब्द गेले असतील, तर माध्यमांची दिलगिरी व्यक्त करा, असे मी त्यांना स्पष्टपणे सांगितले असल्याची माहिती शिंदे यांनी दिली आहे.

तर दुसरीकडे, अमरावतीच्या आदिवासी अभ्यासिका भाडे घोटाळ्यावरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारला थेट धारेवर धरले. या अभ्यासिकेसाठी दरमहा तब्बल ८ लाख रुपये भाडे देण्याच्या करारात मोठी अनियमितता झाल्याची कबुली अखेर आदिवासी विकास मंत्र्यांनी सभागृहात दिली. यावरून वडेट्टीवार अधिकच आक्रमक झाले असून, ''केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांचा बळी देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाचवण्याचा सरकारचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही,'' असा इशारा त्यांनी दिला. कर्जमाफी, कायदा-सुव्यवस्था आणि या नव्या घोटाळ्यांमुळे चौथ्या दिवशीही सभागृहात जोरदार संघर्ष पाहायला मिळत आहे.

## खासगी रुग्णालयांनी उपचारांचे दरफलक लावणे बंधनकारक-आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- राज्यातील खासगी रुग्णालयांनी उपचारांचे दरफलक लावणे बंधनकारक असून त्यानुसारच रुग्णांकडून देयके आकारावीत. तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत नियमबाह्य पद्धतीने रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करण्यात येईल. प्रसंगी संबंधित रुग्णालयांना ब्लॅकलिस्टही केले जाईल, असे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य बापूसाहेब पठारे यांनी या संदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली. त्यावरील चर्चेत सदस्य नमिता मुंदडा, मनीषा चौधरी, सुलभा खोडके, श्वेता महाले, ज्योती गायकवाड, मुरजी पटेल, संजय केळकर, नितीन राऊत, सत्यजित देशमुख आणि सुनील शेळके यांनी सहभाग घेतला.

मंत्री आबिटकर म्हणाले, राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये बेडची संख्या वाढविण्यासाठी समिती नेमून निर्णय घेतला जाईल. त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठका घेण्यात येतील. राज्यात नवजात बालकांच्या उपचारासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ६६ ठिकाणी विशेष नवजात काळजी कक्ष सुरू करण्यात आले आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

## नसरापूर अत्याचार प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे दोषी!

### सोमवारी न्यायालय निकाल जाहीर करणार, आरोपीला फाशीची मागणी

पुणे दि.२५ (प्रतिनिधी)- भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्यचार करुन तिचा खून करणारा आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांनी दोषी ठरवले. 'हा गुन्हा 'दुर्मिळातील दुर्मिळ' आहे. आरोपी कांबळे याला फाशीची शिक्षा देण्यात यावी', अशी विनंती विशेष ससकारी वकील अजय मिसर यांनी न्यायालयाकडे केली. न्यायालयाने सरकार पक्ष, तसेच बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून निकाल राखून ठेवला आहे. येत्या सोमवारी (२९ जून) न्यायालय निकाल जाहीर करणार आहे.

नसरापूर अत्याचार प्रकरणात सरकार पक्ष आणि बचाव पक्षाने अंतिम युक्तिवाद पूर्ण केला. 'आरोपी कांबळे याने केलेले कृत्य घृणास्पद , क्रुर आणि समाजमन हादरवणारे आहे. त्यामुळे आरोपीला कठोर शिक्षा द्यावी', असे विशेष सरकारी वकील मिसर यांनी युक्तीवादात नमूद करुन सर्वोच्च न्यायालयने दिलेल्या १२ महत्त्वपूर्ण निकालाचा संदर्भ दिला. 'महिला आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे अस्तित्वात आहेत. कायदे अस्तित्वात असताना अशा प्रकारचे गुन्हे घडतात. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना कायद्याचा धाक बसविण्यासठी कठोर शिक्षा देण्यात यावी,' असे मिसर यांनी युक्तिवादात सांगितले.

सरकार पक्षाने सादर केलेला डीएनए अहवाल, न्यायवैद्यकीय पुरावे, सीसीटीव्ही चित्रीकरण, परिस्थितीजन्य पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष विचारात घेतल्यास आरोपीने गुन्हा केल्याचे (पान ४ वर)

## पंतप्रधान मोदींनी मोहन भागवतांना गुलाम केले, प्रकाश आंबेडकरांचा खळबळजनक दावा

नागपूर दि.२५ (प्रतिनिधी)- वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी नेहमीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपला लक्ष्य केले आहे. गुरुवारी नागपुरात पुन्हा त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गुलाम झाल्याचे दिसत असल्याचे नमुद केले.

ॲड. प्रकाश आंबेडकर गुरुवारी नागपुरातील रवीभवनात आयोजित पत्रकारपरिषदेत बोलत होते. ते म्हणाले, लेखिका मधुकेश्वर, ज्येष्ठ नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चारित्र्यावर जाहीररित्या शंका व्यक्त केली आहे. त्यांनी शंका व्यक्त केल्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी या जाहीर आरोपाबाबत पंतप्रधानांना स्पष्टीकरण मागितले नाही. मोहन भागवत पंतप्रधानांना जाहिर आरोबाबत खुलासाही मागत नाही. त्यामुळे पंतप्रधानांनी त्यांना गुलाम केले आहे, असे मी मानतो, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

देशात प्रत्येक राजकीय माणूस आज गुलाम झाला आहे. विधानपरिषदेच्या नुकताच झालेल्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार मतदान नव्हते तरीही शेवटपर्यंत लढले. परंतु काँग्रेसचे उमेदवार अर्ध्यावर पळून गेले किंवा लढलेच नाही. त्यामुळे राजकीय पक्ष गुलाम होत आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, असे आंबेडकर म्हणाले.

जगातील नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून त्यांना जे हवे आहे, ते करून घेतात अशी स्थिती आहे. पंतप्रधानांच्या कमजोरीचा फायदा घेऊन देशाचे शोषण करीत आहेत. देशात शेतकऱ्यांसाठी संविधानाने कृषी बाजार आरक्षित ठेवला होता, तो आता अमेरिकेसोबतच्या करारामुळे जगाला खुला होणार आहे. यासारख्या अनेक उदाहरणातून देशाचे आर्थिक संकट वाढत असून आता सामान्य माणसाने आवाज उठवायला सुरुवात केली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. जगात देशाची पत घसरत असून देशाला आर्थिक गुलामगिरीकडे नेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, असा आरोप त्यांनी केला.

राजकीय व्यवस्थेला लकवा मारला असेल तर लोकांनी पक्षाघात झाल्यासारखे वागणे योग्य नाही. लोकांनी या व्यवस्थेला प्रश्न विचारायला पाहिजे. खुर्ची खाली करण्याची मागणी केली पाहिजे वंचित बहुजन आघाडी या सरकारचे अपयश, त्रुटी मांडत आहे, लोकांनी मात्र उठाव केला पाहिजे. विरोधी पक्ष हवा की नको, हे लोकांनी ठरवले पाहिजे. महाविकास आघाडीचे विसर्जन झाले आहे. प्रत्येकजण वैयक्तिकरित्या भाजपसोबत जात आहे असेही ते म्हणाले.

## कल्पना खरातला सशर्त अटकपूर्व जामीन मंजूर

नाशिक दि.२५ (प्रतिनिधी)- दैवीशक्तीचा धाक दाखवून जमीन हडप केल्याच्या प्रकरणात संशयित भोंदू बाबा अशोक खरातची पत्नी कल्पना खरात हिचा अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे. सिन्नर पोलीस ठाण्यात दाखल फसवणूक प्रकरणात नाशिकरोड अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश केदार कोपळकर यांनी कल्पना खरातला हा सशर्त अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने आरोपीला १ लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तितक्याच रकमेचा जामीनदार सादर करण्याच्या अटीवर हा जामीन दिला आहे. सदर कथित जमिनीचा व्यवहार २००४ मधील आहे. तक्रारदार शिवराम माळी यांनी तब्बल २२ वर्षांनंतर, २०२६ मध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल केला. या प्रदीर्घ कालावधीत फिर्यादी किंवा त्यांच्या भावांनी खरेदीखत रद्द करण्यासाठी किंवा जमिनीचा ताबा मिळवण्यासाठी कधीही दिवाणी न्यायालयात दाद मागितली नव्हती, ही बाब न्यायालयाने प्रकर्षाने नोंदवली. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने महत्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. करार करताना फसवणुकीचा कोणताही अप्रामाणिक हेतू असल्याचे तपासात समोर आलेले नाही, असे स्पष्ट मत न्यायालयाने व्यक्त केले. तसेच, हा व्यवहार नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे अधिकृतरीत्या झाला असून, केवळ दिवाणी वादाला गुन्हेगारी प्रकरणाचा रंग देण्याचा प्रयत्न झाल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

## पुढील ४८ तासांत राज्यभरात पावसाचा जोर वाढणार

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- राज्यभरात जवळपास २० दिवस उशिरा आलेल्या पावसने यंदा आगमनाची चांगलीच वाट पाहायला लावली. दरवर्षी साधारण ४ जूनदरम्यान कोकण किनारपट्टीवर दाखल होणारा मान्सून यंदा सोलापूर हर्णे भागातच अडखळला. त्यात प्रशांत महासागरातील अल निनोच्या प्रगतीमुळे नैऋत्य मोसमी वाऱ्यांची वाट खडतर झाली होती. मात्र आता अखेर मान्सून संपूर्ण महाराष्ट्रात सक्रीय झाला आहे. येत्या काही दिवसात पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता असून हवामान विभागाने २७ जुलैदरम्यान महाराष्ट्रासाठी महत्त्वाचे इशारे दिले आहेत.

दरम्यान, कोकण किनारपट्टीसह संपूर्ण मुंबईनगरीत पहिल्याच दिवशी पावसाने तुफान हजेरी लावली. पुण्यासह मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांमधेही जोरदार पाऊस झालाय.

देशभरात नैऋत्य मान्सूनची प्रगती वेगाने सुरू असून २३ जून रोजी मान्सून मध्य अरबी समुद्रातील उर्वरित भाग, महाराष्ट्रातील मुंबईसह आणखी काही भाग, तसेच तेलंगणा आणि ओडिशामधील उर्वरित भागांमध्ये पुढे सरकला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून उत्तर अरबी समुद्राच्या काही भागांत, गुजरातमध्ये, महाराष्ट्रातील आणखी काही भागांत तसेच छत्तीसगड आणि मध्य प्रदेशातील काही भागांत पुढे सरकण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, पश्चिमेकडील वारे सुमारे १.५ किलोमीटर उंचीपर्यंत अधिक मजबूत झाले असून उत्तर सोमालिया किनारपट्टीलगत कमी दाबाचा जेट प्रवाह सक्रिय आहे. यामुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड आणि सोयगाव परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाला. अनेक रस्ते आणि पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक ठप्प झाली होती. याच दरम्यान पुलावरून एक तरुण वाहून जात असल्याचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर वेगाने व्हायरल होत आहे.जळगाव जिल्ह्यात काल झालेल्या अतिवृष्टीमुळे रावेर आणि मुक्ताईनगर भागात पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर मध्यरात्री जळगाव शहरातही मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे शहरातील अनेक भागांमध्ये पाणी शिरले. वाल्मीक नगर परिसरातील एका शाळेत मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागला.

अमरावती जिल्ह्यात मागील २४ तासांत सरासरी १७.३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. तर अमरावती शहरात काल अवघ्या दीड तासात तब्बल ९१.५ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला. त्यामुळे शहरातील अनेक भागांत पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## महाविकास आघाडीच्या बैठकीला २३ आमदारांची दांडी

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला नुकतीच सुरुवात झाली असून सरकारच्या विरोधात रणनीती आखण्यासाठी महाविकास आघाडीने बोलावलेल्या एका अत्यंत महत्त्वाच्या बैठकीला तब्बल २३ आमदारांनी पाठ फिरवल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या अनुपस्थित आमदारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांचाही समावेश असल्याने महाविकास आघाडीचे टेन्शन वाढले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही या गैरहजेरीची दखल घेत आपल्यात खरोखर एकी आहे का? अशी चिंता व्यक्त केल्याची माहिती समोर आली आहे.

मविआच्या बैठकीला अनुपस्थित असलेल्या २३ पैकी १६ आमदारांची नावे समोर आली आहेत. यामध्ये काँग्रेसचे ६ आमदार- नाना पटोले, विजय वडेट्टीवार, अमित देशमुख, असलम शेख, विश्वजीत कदम, विकास ठाकरे. राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे ५ आमदार- जयंत पाटील, रोहित पवार, संदीप क्षीरसागर, अभिजित पाटील आणि आणखी एक. याशिवाय शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ५ आमदार- सुनील राऊत, गजानन लवटे, बाबाजी काळे, राहुल पाटील आणि संजय दरेकर यांचा समावेश आहे.

जयंत पाटील म्हणाले, ''बैठक आधी २३ तारखेला होणार होती, ती अचानक २४ तारखेला निश्चित करण्यात आली. मी एक-दीड महिन्यांपूर्वीच दोन लग्नांना उपस्थित राहण्याची कमिटमेंट दिली होती आणि २४ तारीख ही लग्नाची तिथी असल्याने मला तिथे जाणे भाग होते. मी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना याची पूर्वकल्पना दिली होती. लग्नाच्या तिथीमुळे अनेक आमदार आपल्या मतदारसंघात व्यस्त असतील.'' दुसरीकडे, नाना पटोले म्हणाले, वैयक्तिक कारणांमुळे अनुपस्थित होतो. तर विजय वडेट्टीवार म्हणाले, तब्येत बरी नसल्यामुळे बैठकीला उपस्थित राहू शकलो नाहीत.

# सामाजिक न्यायाचे जनक; छत्रपती शाहू महाराज

भारताला थोर राजा महाराजांच्या जनकल्याण कार्याची मोठी परंपरा लाभलेली आहे. या राजा महाराजांनी आपल्या गादीचा उपयोग आरामात, चैनित किंवा विलासात जीवन जगण्यासाठी केला नाही. तर या राजपदाचा उपयोग जनकल्याणा साठी केला. सामाजिक बंधुभाव, समता, दलित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती विकास, उद्योग धंदे वाढ, कला, क्रीडा, आरोग्य इत्यादी क्षेत्रात विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी केला. अशा थोर समाजसुधारकात सर्वात वरचा नंबर छत्रपती शाहू महाराजांचा सर्वात वर आहे. समाजातील गोर-गरीब, दीन दुबळे, उपेक्षित, मागासवर्गीय, व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीन विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणारा तत्कालीन महाराजा म्हणजे छत्रपती शाहू महाराज होतं.

समाजातील 'आहेरे आणि नाहिरे' या वर्गातील दरी मिटविण्यासाठी महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य पनाला लावले. मागासवर्गीयांचे जीवनमान सुधारून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थांनात आरक्षण कायदा लागू केला. समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्धेशाने त्यांनी अस्पृश्यता निवारण करण्यास्तव जातीभेद निर्मूलन व बलुतेदार पद्धतीवर बंदी आणली. स्त्रीशिक्षण, महिला संरक्षण कायदा, महारवतन खालसा, देवदासी प्रथेचे उच्चटन विधवा पुनर्विवाह कायदा, आंतर जातीय विवाहास प्रोत्साहन अशा विविध समाजोपयोगी बाबीना अमलात आणण्यासाठी अनेक चांगले निर्णय घेतले. एव्हढेच नव्हे तर त्या निर्णयांची अंमलबजावणी होते का नाही? याची स्वतः जाऊन ते खात्री करीत असत, अशा या जनतेच्या कैवारी असलेल्या महान सुधारकाचा जन्म २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर येथे झाला. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव आबासाहेब घाडगे होते, तर आईचे नाव राधाबाई होते, शाहू महाराज आपल्या नावाप्रमाणेच यशवंत राहिले, आपल्या वयाच्या दहाव्या वर्षीच कोल्हापूर चे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई यांनी १८मार्च १८८४ रोजी त्यांना दत्तक घेतले व यशवंतराव कोल्हापूर संस्थांनचे छत्रपती शाहू महाराज झाले. शाहू महाराजांचे राजकोट येथे शिक्षण झाले. महाराज अफाट बुद्धिमत्ता धारक होते. त्याना क्रेजर नावाच्या इंग्लिश शिक्षकांनी राज्यकारभार चालविण्यांचे शिक्षण दिले,

शाहू महाराज जनतेचे 'जाणते राजे होते' आधुनिक भारताचे निष्ठवंत भाग्य विधाते होते, महाराजांचे शैक्षणिक कार्य बघता त्यांनी बहुजनांसाठी शैक्षणिक दारे उघडी करण्याचा निर्णय घेतला, बहुजन समाजाला शिक्षण देऊन शहाणे करावयाचे व आपली सत्ता, संपत्ती, त्यांच्या कल्याणासाठी वापरावी हा कल्याणकारी निर्णय त्यांनी घेतला यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले, पाचशे ते एक हजार लोकवस्ती तेथे शाळा उघडल्या, सर्व विद्यार्थ्यांसाठी वस्ती गृहे आणि शाळांची उभारणी केली. गरीब, दलित, इत्यादी सर्व बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाचे दरवाजे सताड उघडे केले, त्यांनी २१मे १९११ रोजी त्यांनी आर्थिक दृष्ट्या दुर्बल असर्णाया फी माफीचा निर्णय जाहीर केला. ८सप्टेंबर१९१७रोजी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा जाहीरनामा काढला. १जानेवारी१९१९ रोजी प्राथमिक,माध्यमिक,व महाविद्यालयातील अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलांसारखी समानतेची वागणूक द्यावी म्हणून शिक्षण खात्याला आदेश दिला. ३०सप्टेंबर१९१९ रोजी आदेश काढून अस्पृश्य साठी असलेल्या शाळा बंद करण्यात आल्या. यावरून महाराजांची शिक्षणबाबतची दूर दृष्टी दिसून येते. गाव तेथे शाळा प्रथम शाहू महाराज यांनी सुरू केल्या. समाजातील क्रूर व वाईट प्रथा रूढींना पायबंद बसावा, तसेच हुंडा प्रथा बंद व्हावी, दारूबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन व्हावे, सामाजिक ऐक्य टिकून राहावे, स्वदेशीचा आग्रह, बालविवाह थांबावे असे किती तरी लोकहिताचे विषय घेऊन समाज सुधारणेला त्यांनी प्राधान्य दिले. धर्म व जाती निरपेक्ष कार्यतही त्यांचे मोठे योगदान आहे, जातीभेद त्यांना मान्य नव्हता, त्यांनी१९१८ साली आंतर जातीय विवाह साठी कायदा मंजूर केला. आंतरजातीय विवाहामुळे जात, पात, धर्म, संप्रदाय निश्चितपणे नष्ट होऊ शकतात असे त्यांचे मत होते, शाहू महाराजांनी २४ आंतरजातीय विवाह घडवून आणले. केवळ शेती व्यवसायावर सर्वांनी अवलंबून रहावे हे त्यांना मान्य नव्हते. बहुजन समाजाने व्यापार ही करावा. छोटा-मोठा उद्योग करावा असे त्यांना वाटत असे, शेती व्यवसायाला जोड धंद्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. २०सप्टेंबर १९०६ रोजी कोल्हापूरात त्यांनी शाहू स्पीनिग मिलची निर्मिती केली. आर्थिक संपन्नता केवळ शेतीवर व्यवसायवर अवलंबून असते असे नव्हे तर त्यासाठी औद्योगिककरणं ही महत्वाचे असते असे त्यांचे मत होते, शेती व्यवसाय कडे ही महाराजांनी जातीने लक्ष दिले, 'पाणी अडवा पाणी जिरवा' हे धोरण त्यांनी अंमलात आणले, म्हणून १९०९साली त्यांनी राधानगरी धरण प्रकल्प हाती घेतला. १९१८साली हे धरण पूर्ण झाले यात सहाशे दश लक्ष घनफुट पाणी अडवून ते शेती साठी उपयोगात आणले, स्त्री हक्क स्वातंत्र्य साठी महाराजांनी पुढाकार घेतला, शाहू महाराजांचे कार्य असे सर्व समावेशक होते, राजा असूनही ते लोकांसाठी व समाजासाठी राज ऋषी सारखे जगले, समाजाला न्यायचा व प्रगतीचा प्रकाश दिला, अशा थोर महाराजांचा स्वर्गवास १९२२ साली झाला.

# राजर्षी शाहू महाराज : सामाजिक समतेचा क्रांतीसूर्य

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोककल्याणकारी इतिहासात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे स्थान अत्यंत मानाचे आणि अद्वितीय आहे. भारतीय समाजात सामाजिक न्याय, समता, शिक्षणाचा प्रसार आणि दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणाचा विचार प्रत्यक्ष शासन कारभाराच्या माध्यमातून यशस्वीपणे राबविणारे ते पहिले लोकाभिमुख राजे म्हणून ओळखले जातात. एकीकडे भारतावर ब्रिटिश सत्ता होती, तर दुसरीकडे भारतीय समाज जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, निरक्षरता आणि आर्थिक विषमता यांसारख्या अनेक समस्यांनी ग्रासलेला होता. अशा काळात कोल्हापूर संस्थानच्या गादीवर आरूढ झालेल्या शाहू महाराजांनी केवळ एक राजा म्हणून राज्यकारभार केला नाही, तर समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. म्हणूनच त्यांना 'राजर्षी' या उपाधीने गौरविण्यात आले आणि सामाजिक न्यायाच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर झाले.

२६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांचा जन्म झाला. पुढे कोल्हापूर संस्थानच्या दत्तक विधी नंतर त्यांचे नाव शाहू छत्रपती ठेवण्यात आले. त्यांचे बालपण राजघराण्यात गेले असले, तरी त्यांच्या मनात सामान्य जनतेविषयी असलेली आस्था आणि सामाजिक प्रश्नांविषयीची संवेदनशीलता लहानपणापासूनच दिसून येत होती. त्यांचे शिक्षण राजकोटमध्ये झाले. शिक्षणादरम्यान त्यांनी आधुनिक विचार, लोकशाही मूल्ये, प्रशासनशास्त्र आणि सामाजिक वास्तव यांचा अभ्यास केला. भारतातील बहुजन समाजाची दयनीय अवस्था, शिक्षणापासून वंचित राहिलेली जनता, अस्पृश्यतेच्या विळख्यात अडकलेले लाखो लोक आणि स्त्रियांची दुय्यम स्थिती यांचे वास्तव त्यांनी जवळून अनुभवले. याच अनुभवांनी त्यांच्या मनात सामाजिक परिवर्तनाचा दृढ संकल्प निर्माण केला.

१८९४ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानचा कारभार हाती घेतला. त्या काळात बहुजन समाजाला शिक्षण, नोकरी, सामाजिक प्रतिष्ठा आणि राजकीय सहभाग यांपासून दूर ठेवले जात होते. प्रशासनात काही विशिष्ट वर्गांचे वर्चस्व होते. जातिव्यवस्थेच्या नावाखाली समाजात अन्याय आणि विषमता रुजली होती. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी राज्यकारभाराचा केंद्रबिंदू 'रयतेचे कल्याण' हा ठेवला. त्यांना वाटत होते की राज्यकर्त्याचे कर्तव्य केवळ कर गोळा करणे किंवा कायदा-सुव्यवस्था राखणे एवढेच नसून समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, हा विचार शाहू महाराजांच्या संपूर्ण कार्यामागे दिसून येतो. शिक्षणाशिवाय समाजातील विषमता दूर होऊ शकत नाही, हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी व्यापक धोरण स्वीकारले. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध वसतिगृहे सुरू करण्यात आली. मराठा, जैन, मुस्लिम, लिंगायत, दलित आणि इतर समाजघटकांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आली. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी अनेक शाळा सुरू करण्यात आल्या.



शिक्षण हा मोजक्या लोकांचा विशेषाधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे, अशी त्यांची धारणा होती.

सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात शाहू महाराजांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे आरक्षणाची अंमलबजावणी होय. २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी मागासवर्गीय समाजासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय भारतीय इतिहासातील सामाजिक न्यायाच्या चळवळीतील मैलाचा दगड मानला जातो. समाजातील काही घटक शतकानुशतके शिक्षण आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित राहिले होते. त्यामुळे त्यांना समान संधी मिळण्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे शाहू महाराजांचे मत होते. आज भारतीय राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या आरक्षणाच्या तत्त्वाचा पाया त्यांच्या या निर्णयात दिसून येतो. म्हणूनच त्यांना सामाजिक न्यायाचे जनक असेही संबोधले जाते. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अस्पृश्यतेमुळे समाजातील लाखो लोकांना मानवी सन्मानापासून वंचित ठेवले जात होते. शाहू महाराजांनी या अमानुष प्रथेला कठोर विरोध केला. सार्वजनिक विहिरी, तलाव, धर्मशाळा, शाळा आणि सरकारी कार्यालये सर्वांसाठी खुली करण्यात आली. दलित समाजातील लोकांना शिक्षण, नोकरी आणि सामाजिक जीवनात समान संधी मिळाव्यात यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मते मनुष्याची किंमत त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या गुणांवर आणि कर्तृत्वावर ठरली पाहिजे. त्यामुळे त्यांनी जातीय श्रेष्ठत्वाच्या संकल्पनेला स्पष्टपणे नाकारले. शाहू महाराजांनी १९१७ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्या काळात असा निर्णय घेणे अत्यंत धाडसी होते. यामुळे गरीब आणि मागास कुटुंबांतील मुलांनाही शिक्षणाची दारे खुली झाली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात आत्मविश्वास, स्वाभिमान आणि प्रगतीची प्रेरणा निर्माण होईल, असा त्यांचा विश्वास होता. आज शिक्षणाचा अधिकार हा ज्या प्रकारे लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य भाग मानला जातो, त्याची पायाभरणी शाहू महाराजांच्या अशा दूरदर्शी निर्णयांतून झालेली दिसते. स्त्री शिक्षण आणि स्त्रीसक्षमीकरण हे शाहू महाराजांच्या कार्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे समाजातील अनेकांना मान्य नव्हते. स्त्रियांना घराच्या चौकटीतच मर्यादित ठेवण्याची मानसिकता प्रबळ होती. परंतु शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. मुलींसाठी शाळा सुरू केल्या, त्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले आणि स्त्री शिक्षणाबाबत समाजात जागृती निर्माण केली. शिक्षित स्त्री ही कुटुंब आणि समाजाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे, असे ते मानत. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले, स्त्रियांवरील अन्यायकारक प्रथांना विरोध केला आणि महिलांच्या सन्मानासाठी विविध उपाययोजना राबवल्या. महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांचा शाहू महाराजांवर खोल प्रभाव होता. फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी, स्त्रियांच्या उन्नतीसाठी आणि सामाजिक समतेसाठी फुले यांनी जो संघर्ष केला, त्याला शाहू महाराजांनी प्रशासनाच्या माध्यमातून बळ दिले. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यासाठी आवश्यक पाठबळ उपलब्ध करून दिले. त्यामुळे महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीला नवी ऊर्जा मिळाली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला प्रारंभीच्या काळात पाठबळ देणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाची क्षमता आणि त्यांचे सामाजिक भान शाहू महाराजांनी ओळखले होते. त्यांनी विविध प्रसंगी आंबेडकरांना प्रोत्साहन दिले आणि दलित समाजाच्या प्रश्नांवर त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. १९२० मध्ये माणगाव येथे झालेल्या परिषदेत शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांविषयी व्यक्त केलेले गौरवोद्गार आजही प्रसिद्ध आहेत. सामाजिक न्यायाच्या लढ्यातील ही ऐतिहासिक मैत्री भारतीय इतिहासातील एक प्रेरणादायी घटना आहे. शेतकरी आणि ग्रामीण विकासासाठी शाहू महाराजांनी अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा होणे आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती. त्यांनी सिंचन व्यवस्था विकसित केली, जलसंधारणाच्या योजना राबवल्या आणि कृषी विकासासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी त्यांनी सहकाराच्या तत्त्वालाही प्रोत्साहन दिले. कामगार कल्याणाच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. औद्योगिक विकासासोबत कामगारांच्या हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे, असे ते मानत. कामगारांना योग्य वेतन, सुरक्षित कामाचे वातावरण आणि मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाला समान महत्त्व देणे हीच खरी लोककल्याणकारी शासनव्यवस्था आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. धार्मिक क्षेत्रात शाहू महाराजांचा दृष्टिकोन अत्यंत उदार आणि मानवतावादी होता. त्यांनी धर्माचा वापर समाजकल्याणासाठी व्हावा, अशी भूमिका घेतली. धर्माच्या नावाखाली होणाऱ्या भेदभावाला त्यांनी विरोध केला. सर्व धर्मांचा आदर राखत त्यांनी सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता ही कोणत्याही धर्मापेक्षा श्रेष्ठ होती. सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. साहित्य, संगीत, नाटक, लोककला आणि चित्रकला यांना त्यांनी सक्रिय प्रोत्साहन दिले. कलाकारांना आश्रय आणि आर्थिक मदत देऊन त्यांनी सांस्कृतिक विकासाला चालना दिली. कोल्हापूर हे सांस्कृतिक चळवळींचे महत्त्वाचे केंद्र बनले. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्कृतीचे जतन आणि संवर्धन आवश्यक आहे, असे ते मानत. क्रीडा क्षेत्रात त्यांनी विशेषतः कुस्तीला दिलेले प्रोत्साहन उल्लेखनीय आहे. कोल्हापूरची कुस्ती परंपरा देशभर प्रसिद्ध होण्यामागे शाहू महाराजांचे मोठे योगदान आहे. त्यांनी आखाड्यांची उभारणी केली, पैलवानांना प्रोत्साहन दिले आणि क्रीडा संस्कृतीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. खेळांमुळे युवकांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि आरोग्यदायी जीवनशैली विकसित होते, असा त्यांचा विश्वास होता. प्रशासनाच्या क्षेत्रात शाहू महाराजांनी लोकाभिमुख शासनाचा आदर्श निर्माण केला. ते थेट जनतेशी संवाद साधत असत. सामान्य माणसांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यावर त्यांचा भर असे. प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांना त्यांनी प्राधान्य दिले. त्यांच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थान हे लोककल्याणकारी शासनाचे आदर्श उदाहरण बनले.

शाहू महाराजांचा स्वभाव अत्यंत साधा, विनम्र आणि संवेदनशील होता. राजेपद असूनही त्यांच्यात कोणताही अहंकार नव्हता. गरीब, शेतकरी, कामगार, दलित आणि वंचित समाजघटकांच्या दुःखाविषयी त्यांना प्रचंड कळकळ होती. त्यांनी राजसत्तेचा उपयोग स्वतःच्या वैभवासाठी न करता लोकांच्या उन्नतीसाठी केला. त्यामुळेच जनतेच्या मनात त्यांच्याविषयी अपार आदर निर्माण झाला आणि त्यांना 'राजर्षी' ही उपाधी प्राप्त झाली. ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक न्यायाच्या चळवळीतील एक तेजस्वी पर्व संपले; परंतु त्यांच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाला दिशा देत आहे. शिक्षण, समता, सामाजिक न्याय, स्त्रीसक्षमीकरण आणि लोककल्याणकारी शासन या क्षेत्रांतील त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात त्यांच्या कार्याचा प्रभाव जाणवतो. आजच्या काळात राजर्षी शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वपूर्ण वाटतात. विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाच्या युगातही सामाजिक विषमता, शैक्षणिक असमानता आणि संधींचे असमान वितरण या समस्या कायम आहेत. अशा परिस्थितीत समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्यासाठी शिक्षण, आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या धोरणांची आवश्यकता अधिक अधोरेखित होते. शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी मांडलेले विचार आजही मार्गदर्शक ठरतात.

राजर्षी शाहू महाराज हे केवळ एका संस्थानचे अधिपती नव्हते, तर ते आधुनिक भारतातील सामाजिक लोकशाहीचे अग्रदूत होते. त्यांनी समतेवर आधारित समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की सत्ता ही लोकांच्या कल्याणासाठी वापरली गेली तरच तिचे खरे मूल्य सिद्ध होते. त्यांच्या कार्यामुळे लाखो वंचित लोकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला. दि. २६ जून रोजी त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनरुच्चार करणे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.

शिक्षण आणि विकासाच्या संधी सर्वांना समानपणे मिळाल्या पाहिजेत आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव स्वीकारला जाऊ नये, हा संदेश शाहू महाराजांच्या जीवनातून मिळतो. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण समतामूलक, न्याय्य आणि सर्वसमावेशक समाजनिर्मितीचा संकल्प केला, तर तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराज हे सदैव तेजस्वी दीपस्तंभ म्हणून स्मरणात राहतील आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करत राहील.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# सामाजिक न्यायाचे जनक; छत्रपती शाहू महाराज

कोल्हापूर संस्थांचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या काळात समाजातील गोर, गरीब,दीन, दुबळे, मागासवर्गीय, उपेक्षित व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले.समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्धेशाने त्यांनी अस्पृश्यता निवारण करण्यास्तव जातीभेद निर्मूलन बलुतेदारी पध्दतीवर बंदी आणली,स्त्री शिक्षण, महिला संरक्षण कायदा, महारवतन खालसा,देवदासी प्रथेचे उच्चाटन,विधवा पुनर्विवाह कायदा,आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन अशा विविध समाजपयोगी बाबींना अंमलात आणण्यासाठी त्यांनी अनेक उत्कृष्ट निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली.शाहू महाराज 'जाणते राजे होते'. आधुनिक भारताचे निष्ठावंत भाग्य विधाते म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या राजाने हिंदुस्थानच्या इतर संस्थानिका प्रमाणे राज ऐश्वर्याचा सुखापुभोग घेत जीवन न जगता ते राजवाड्यातून दलितांच्या वस्तीत, झोपडीत जाऊन त्यांची सुख, दुःखे जाणून घेत होते. बहुजन समाजाची धार्मिक, सामाजिक गुलामगिरी आणि त्यांचे दारिद्र्य यावर एकच उपाय तो म्हणजे बहुजन समाजाचे शिक्षण, बहुजन समाजाला शिक्षण देऊन शहाणे करावयाचे आणि आपली सत्ता, संपत्ती त्यांच्या कल्याण व शिक्षणसाठी वापरायची हा क्रांतीकारी निर्णय घेऊन त्यांनी शाळांची निर्मिती केली,सर्व विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे स्थापन केली.बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षणाची दारे खुली केली.

छत्रपती शाहू महाराजांनी१९०९ साली राधानगरी धरण बांधले. ग्रामीण भागातील शेती व्यवसायाची भरभराट व्हावी असे त्यांचे धोरण होते. शेती अवजारांचे संग्रहालय त्यांनी सुरू करून शेतकऱ्यांना अवजारे पुरविण्याची व्यवस्था केली. क्रूर व वाईट रूढी व प्रथाना पायबंद बसावा म्हणून उपाय योजना केल्या. दारूचे दुष्परिणाम, अंधश्रद्धा निर्मूलन व्हावे म्हणून कडक उपाय योजना केल्या. शेती व्यवसायाला जोड धंद्याची जोड म्हणून शाहू महाराजांनी २० सप्टेंबर, १९०६ रोजी कोल्हापुरात शाहू स्पिनिंग मिलची स्थापना केली. आर्थिक संपन्नता केवळ शेती व्यवसायावर अवलंबून असते असे नाही, त्यासाठी औद्योगिकरण ही महत्वाचे आहे असे त्यांचे मत होते.शाहू महाराज यांचे कार्य धर्म व जाती निरपेक्ष होते. जातीभेद त्यांना मान्य नव्हता.१९१८ साली त्यानी आंतर जातीय विवाह कायदा मंजूर केला. या मुळे जात-पात, धर्म, संप्रदाय नष्ट होतात असे त्यांचे मत होते.शाहू महाराजांचे कार्य अशा प्रकारे सर्व समावेशक होते. म्हणून त्याना सामाजिक न्यायाचे जनक ही म्हणतात.

**– धोंडीरामसिंह राजपूत**


## छत्रपती शाहू महाराज

शाहू महाराजांचे कार्य
जगी असे महान
गुण गाती जगती
थोर आणि लहान
सामाजिक असमानता
त्यांनी केली दूर
सामाजिक न्यायाने
भरलेले त्यांचे ऊर
स्त्री हक्कांची त्यांना
लागताच चाहूल
स्त्रियांसाठी उचलले
त्यांनी खंबीर पाऊल
शैक्षणिक कार्याचाही
रचला त्यांनी पाया
दूर केली समाजातून
अंधश्रद्धा आणि माया
आधुनिक शेतीचेही असती
शाहूं महाराज पुरस्कर्ते
शेतिसाठी उभे केले
त्यांनी अनेक कार्यकर्ते
शाहूंचा सामाजिक न्याय
अमलात आणू या
स्मृतींना त्यांच्या आपण
आज प्रणाम करू या

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# 'अलका याज्ञिक सुरांची राणी'

भारतीय संगीतविश्वासाठी २३ जून २०२६ हा दिवस अत्यंत आनंदाचा ठरला. कारण हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक लोकप्रिय पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना त्यांच्या अमूल्य योगदानासाठी भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान 'पद्मभूषण' प्रदान करण्यात आला.राष्ट्रपती भवन येथे झालेल्या दुसऱ्या नागरी सन्मान सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते अलका याज्ञिक यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.१९००ते २००० च्या दशकात अलका याज्ञिक यांच्या आवाजाने हिंदी सिनेमाला नवे आयाम मिळाले. 'खलनायक', 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे', 'ताल' यांसारख्या चित्रपटांतील त्यांची गाणी आजही अविस्मरणीय आहेत. गेल्या अनेक दशकांत त्यांनी हजारो गाण्यांना स्वर दिला आणि कोट्यवधी संगीतप्रेमींची मने जिंकली. पण सध्या त्या आरोग्याशी लढा देत आहे.पद्मभूषण मिळाल्याच्या वेळी अलका याज्ञिक यांची प्रकृती पाहून सर्वच चाहते चिंतित झाले. गेल्या दोन वर्षांपासून त्या दुमिळ श्रवणदोषामुळे सार्वजनिक जीवनापासून दूर होत्या. मात्र सन्मान स्वीकारताना त्यांनी भावनिक पत्र लिहून सांगितले,हे सन्मान फक्त माझे नाही, तर माझे गाणे ऐकणाऱ्या, पिढ्यानुपिढ्या त्याला जपणाऱ्या प्रत्येक श्रोत्याचे आहेत.मी हळूहळू माझा मार्ग परत शोधत आहे. आज इथे येणे हे माझ्यासाठी केवळ मान्यता नव्हे, तर प्रेम,आशा व आठवण आहे असेही त्या म्हणाल्या.पद्मभूषण हा अलका याज्ञिक यांच्या कारकिर्दीतील आणखी एक मानाचा तुरा आहे. त्यांचा आवाज, त्यांची साधी वृत्ती आणि संगीतावरील निष्ठा यामुळे त्या खऱ्या अर्थाने 'सुरांची राणी' आहेत. हा पुरस्कार केवळ एका गायिकेचा नाही, तर संपूर्ण भारतीय संगीतपरंपरेचा गौरव आहे.



**– सुदाम भाऊसाहेब शिंदे**
मु.पो.ता. विनायक कॉलनी वैजापूर
जिल्हा छत्रपती संभाजीनगर

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय

**शेतकरी** राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.


शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

**कर्जमुक्ती योजना काय आहे –** २०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ




मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही. याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना :** १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

**प्रोत्साहनपर लाभ :** नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील. तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णतः परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा**

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु. ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (जढड) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

**योजनेचे निकष :**

- पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.
- १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.
- ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.
- ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.
- जमीन धारणेची अट नाही.
- पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.
- २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.
- शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.
- राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जांना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत :**

विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य. केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु. २५ हजार पेक्षा अधिक आहे. राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.

- शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती
- निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिक
- मासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).
- कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.

या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**– काशीबाई थोरात,**
विभागीय संपर्क अधिकारी

## लग्नपत्रिकेत जन्मतारीख बंधनकारक करणार

राजस्थान सरकारप्रमाणे महाराष्ट्रातही बालविवाहाच्या प्रथेला आळा घालण्यासाठी लग्नपत्रिकेत वधू-वराची जन्म तारीख नमूद करण्याचे सूतोवाच महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधानसभेत केले. त्याबाबतचा अभ्यास ग्रामविकास, विधी आणि न्याय तसेच संबंधित विभागांच्या समन्वयातून केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. बालविवाह पूर्णपणे रोखण्यासाठी सरकारने कृती आराखडा तयार केला असून, पुढील ५ वर्षांत बालविवाहाचे प्रमाण १० टक्क्यांच्या आत आणण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले.

# जनसंपर्क अभियानांतर्गत माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांचा व्यापारी व नागरिकांशी संवाद



छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) – भारतीय जनता पक्षाच्या जनसंपर्क अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्याचे संयोजक तथा माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री व खासदार डॉ. भागवत कराड यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध व्यापारी व दिगंबर जैन समाजाचे विश्वस्त श्री किरण पहाडे यांच्या किराणा चावडी येथील निवासस्थानी व्यापारी व नागरिकांशी संवाद साधला.

या संवाद कार्यक्रमात परिसरातील व्यापारी, उद्योजक व नागरिकांनी विविध विकासकामे, स्थानिक समस्या तसेच शासनाकडून असलेल्या अपेक्षांबाबत आपली मते मांडली.

कार्यक्रमास नगरसेवक श्री विजय झाला व नगरसेविका सौ. कीर्ती शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राजेश मेहता यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ. भागवत कराड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षांत देशात केलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला. पायाभूत सुविधा, उद्योग, रोजगार, डिजिटल क्रांती, सामाजिक कल्याण योजना आणि आर्थिक विकास या क्षेत्रांतील विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली.

त्यानंतर उपस्थित व्यापारी व नागरिकांकडून शासनाकडून असलेल्या अपेक्षा, स्थानिक अडचणी व विविध प्रश्न जाणून घेत त्यावर सकारात्मक चर्चा केली. जनतेच्या सूचनांची नोंद घेऊन त्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

या संवाद सोहळ्यास डॉ सन्मति ठोले भांडे व्यापारी संघटनेचे अध्यक्ष श्री पातुरकर, सोनार असोसिएशनचे श्री आतिश सवाईवाला, इलेक्ट्रिकल असोसिएशनचे श्री रवि पहाडे, श्री निलेश पहाडे, श्री रमेश कासलीवाल, मोंढा व्यापारी संघाचे प्रतिनिधी श्री उमेश चुडीवाल, श्री निलेश अग्रवाल, श्री मनीष जैस्वाल, श्री निकेतन कासलीवाल यांच्यासह अनेक व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमात विकास, लोकसहभाग आणि नागरिकांच्या अपेक्षांवर सकारात्मक चर्चा झाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# ॲड.वसंतराव साळुंके यांनी वकिली पेशाला दिली समाजकार्याची जोड

## उद्योजक मानसिंग पवार यांचे गौरवोद्गार



छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) – समाजातील शेवटच्या माणसालाही न्याय मिळाला पाहिजे याची जाणीव ठेऊन ॲड.वसंतराव साळुंके वकिली करीत पेशाला सामाजिक कार्याची जोडही दिली. यामुळेच ते पाचव्यांदा निवडून येऊ शकले, असे गौरवोद्गार उद्योजक मानसिंग पवार यांनी काढले.

महाराष्ट्र-गोवा बार कॉन्सिलच्या कार्यकारणीवर ॲड. वसंतराव दिगंबरराव साळुंके यांची सलग पाचव्यांदा निवड झाली. याबद्दल नागरी सत्कार समारंभाचे आयोजन रविवारी पैठण रोडवरील ग्रॅंड कल्याण सभागृहात करण्यात आले. यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, उद्योजक मानसिंग पवार, बार कॉन्सिल सदस्य ॲड. राजेंद्र उमाप, ॲड. वसंतराव साळुंके, मधुमती साळुंके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी पाहुण्यांचे हस्ते साळुंके दांपत्याचा स्मृतिचिन्ह, मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. मानपत्राचे वाचन आणि लेखन डॉ.संजय शिंदे यांनी केले. कर्तृत्व, दांडगा जनसंपर्क, निगर्वी स्वभाव यांच्या बळावर मुंबई-पुण्यासारख्या महानगरांमधील दिग्गजांना शह देत मराठवाडयाच्या मातीचे नाव उज्वल करणारे महाराष्ट्र आणि गोवा वकीत परिषदेचे माजी चेअरमन अँड वसंतराव साळुंके यांचा पाचव्यांदा ऐतिहासिक विजय झाला आहे. १९९८ पासून सुरु असलेला हा विजयी रथ अखंडपणे पाचव्यांदा धावला. वकील परिषदेच्या इतिहासाठी हा एक सुवर्णमय किर्तिमान ठरला आहे.या निमित्त राज्यभरातून आलेल्या शेकडो वकिलांच्या हा कार्यक्रम झाला. उद्योजक मानसिंग पवार यांनी ॲड. साळुंके यांचा वसा आणि वारसा नवीन मंडळींनी पुढे नेला पाहिजे, असे आवाहन केले. तर ॲड. वसंतराव साळुंके यांची लोकप्रियता पाहता त्यांना तहहयात सदस्य करावे, असे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम म्हणाले. सत्काराला उत्तर देताना अँड.वसंतराव साळुंके अत्यंत भावुक झाले. आपल्या यशाचे रहस्य उलगडताना ते म्हणाले, 'माझ्या आयुच्यात निवडणुकीसाठी मला कधीच कोणत्याही अवघड किवा अयोग्य गोष्टी कराव्या लागल्या नाहीत. त्यामुळे मी निवडून आलो असा अहंकार माझ्या तोंडून कधीच निघाला नाही. वकिलांनी मला निवडून दिले ही कृतज्ञतेची भावना माझ्या मनात राहील.

ज्येष्ठ विधिज्ञ रमेशराव धोर्डे आणि मुख्य सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे यांनी साळुंके यांच्या अविरत विजयाचे गमक उलगडताना सांगितले की, 'त्यांच्या निगर्वी स्वभाव, प्रत्येकाच्या सुख-दुखात धावून जाण्याची वृत्ती, वकिलांच्या न्याय हक्कांसाठी सदैव अग्रभागी राहणे. या व अशा अनेक गोष्टींमुख ते वकिलांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. केवळ वकिलीच नव्हे, त्यांच्या पर्यावरणप्रमाणे वृक्षारोपणाच्या ध्यासाचेही यावेळी बळीराम साळुंके यांनी कौतुक केले. ॲड. रवींद्र गोरे यांनी प्रास्ताविक केले. ॲड. दीपक देशमुख यांनी सूत्रसंचालन तर ॲड. सुदर्शन साळुंके यांनी आभार मानले. प्रारंभी ॲड.सुनील काळदाते,ॲड. मयूर साळुंके, ॲड. अशोक ठेळे यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास आ. विक्रम काळे, माजी आ. मोहनराव साळुंके, अरविंद गोरे, बार कौन्सिल सदस्य ॲड.राजेंद्र बागुल यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# फुफ्फुसांच्या पलीकडे: एक सिगारेट आपल्या आध्यात्मिक ऊर्जेची कशी हानी करते !

व्यसनाधीनतेच्या विनाशकारी दुष्परिणामांबद्दल जगाला सतर्क करण्यासाठी दरवर्षी २६ जून 'आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन' म्हणून पाळला जातो. धूम्रपानाच्या शारीरिक दुष्परिणामांबद्दल जगभर जागृती असली, तरी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या एका चित्तवेधक अभ्यासाने आपल्या आरोग्याच्या एका पूर्णतः भिन्न पैलूवर प्रकाश टाकला आहे – आपली सूक्ष्म ऊर्जा !

**प्रयोग: विनाशाचे ८ झुरके**

धूम्रपान एखाद्या व्यक्तीच्या कुंडलिनी-चक्रांवर नेमका काय परिणाम करते, याचा अभ्यास करण्यासाठी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या वतीने नुकताच एक प्रयोग करण्यात आला. कुंडलिनी-चक्रे आपल्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक कार्यांना सूक्ष्म ऊर्जा पुरवतात. 'बायो-वेल' (Bio-Well) (टीप १) हे वैज्ञानिक उपकरण, तसेच पारंपरिक लोलक (Pendulum) यांचा वापर करून, सिगारेटचे केवळ ८ झुरके घेतल्यानंतर एका व्यक्तीच्या कुंडलिनी-चक्रांत झालेल्या ऊर्जा बदलांचा संशोधकांनी अभ्यास केला.

टीप १: बायो-वेल हे उपकरण रशियन संशोधकांनी विकसित केले असून ते इलेक्ट्रो-फोटोनिक इमेजिंग (EPI) तंत्रज्ञानाचा वापर करून एखाद्या व्यक्तीचे ऊर्जा क्षेत्र आणि त्याच्या कुंडलिनीच्या चक्रांची स्थिती (alignment) यांची मोजणी करते.

या प्रयोगासाठी, संशोधकांनी अनेक वर्षे पूर्णवेळ साधना करणाऱ्या एका साधकाची आधी मूलभूत चाचणी घेतली. धूम्रपान करण्यापूर्वी त्याच्या कुंडलिनी-चक्रांतील ऊर्जेची स्थिती निरामय होती.

- **चक्रांची उत्तम स्थिती :** साधकाची सहस्रार, आज्ञा आणि मूलाधार ही चक्रे मध्येरेषेच्या (सुषुम्ना नाडी) लगत, म्हणजे ईश्वरी चैतन्य ग्रहण करण्यास पूरक स्थितीत होती.
- **मोठ्या प्रमाणात सकारात्मक ऊर्जा :** साधकामधे नकारात्मक ऊर्जा शून्य आढळली, तर त्याच्या सकारात्मक ऊर्जेची प्रभावळ ५.३ मीटरपर्यंत होती.

त्यानंतर त्या सहभागी साधकाने (आपली सेवा म्हणून केवळ संशोधनासाठी) सिगारेटचे केवळ आठ झुरके घेतले. यामुळे तात्काळ एक मोठा बदल घडून आला.

लगेचच (० मिनिटांनंतर): सकारात्मक ऊर्जेची प्रभावळ केवळ ०.८ मीटर राहिली, तर नकारात्मक ऊर्जेची प्रभावळ ७ मीटर एवढी निर्माण झाली. २० मिनिटांनंतर : सकारात्मक ऊर्जा पूर्णपणे शून्य झाली आणि नकारात्मक ऊर्जा १५ मीटरपेक्षा जास्त झाली.

सहस्रार आणि मणिपूर चक्रांनी नकारात्मक ऊर्जा ग्रहण केली, ज्यामुळे साधकाची ईश्वरी चैतन्य ग्रहण करण्याची क्षमता, तसेच पचनक्षमता यावर अत्यंत वाईट परिणाम झाला.

- ३० मिनिटांनंतर: शरीराने नकारात्मक ऊर्जेला विरोध करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे ती काही प्रमाणात कमी झाली (१२.५ मीटर) आणि सकारात्मक ऊर्जा (१ मीटर) निर्माण व्हायला सुरुवात झाली.

**निष्कर्ष** – लोलकाच्या सहाय्यानो केलेल्या अभ्यासातील निष्कर्ष पूर्णतः 'बायो-वेल' या उपकरणाने केलेल्या निष्कर्षाशी मिळते-जुळते होते, ज्यात हे स्पष्ट झाले की सिगारेटच्या केवळ ८ झुरक्यांचा नकारात्मक प्रभाव साधकाची चक्रे आणि प्रभामंडळ (Aura) यांवर सुमारे अर्धा तास राहिला. साधक अनेक वर्षांपासून नियमित साधना करत असल्यामुळे हे शक्य झाले. जे लोक नियमित साधना करत नाहीत, त्यांच्यात या नकारात्मकतेशी लढण्याची क्षमता खूप कमी असते. फलस्वरूप त्यांच्यावर धूम्रपानाचे परिणाम दीर्घकाळ राहू शकतात. वारंवार धूम्रपान केल्याने व्यक्तीचे प्रभामंडळ आणि चक्रे यांवर कायमस्वरूपी नकारात्मक परिणाम होऊ शकतात; ज्यामुळे आरोग्याच्या मोठ्या समस्या उद्भवू शकतात. तथापि, निरंतर साधनेच्या माध्यमातून व्यक्ती आपली कुंडलिनी-चक्रे सुदृढ करू शकते आणि व्यसनांवर (addictions) सहज मात करू शकते. हा प्रयोग तर केवळ एक अंशमात्र आहे. MAV कडे असे अनेक केस स्टडीज आहेत जिथे लोकांनी साधनेच्या माध्यमातून किमान प्रत्याहार लक्षणांसह (withdrawal symptoms) अल्प कालावधीत व्यसनांवर मात केली आहे.

**– डॉ. (सौ.) नंदिनी सामंत**
महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय, गोवा.

# 'पद्मश्री भिकल्या लाडक्या धिंडा'

पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील वाळवंडा गावचे रहिवासी भिकल्या लाडक्या धिंडा हे वारली आदिवासी संस्कृतीचा जिवंत श्वास मानल्या जाणाऱ्या 'तारपा' वाद्याचे विख्यात वादक आहेत. वयाच्या ९०-९२ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले ही अतिशय आनंददायक बातमी आहे.तारपा हे सुकलेला भोपळा, बांबू आणि ताडाच्या पानांपासून बनवले आदिवासी वाद्य आहे. ते वाजवण्यासाठी प्रचंड दमसास लागतो. भिकल्या धिंडा यांच्या घराण्यात ही कला दीडशे वर्षांपासून चालत आली आहे. त्यांचे पणजोबा नवश्या धिंडा, आजोबा धाकल्या धिंडा आणि वडील लाडक्या धिंडा हे सर्व निष्णात तारपावादक होते. वयाच्या १०-१२ व्या वर्षापासूनच भिकल्यांनी गुरे चारताना जंगलात तारपा वाजवायला सुरुवात केली. वडिलांनी सांगितले, ङ्गतू ही आपली आदिवासी संस्कृती टिकवङ्घ – आणि तेव्हापासून ७५ वर्षांहून अधिक काळ ते अखंड तारपा वाजवत आहेत. शाळेत न जाता त्यांनी निसर्गातच आपली कला जोपासली. पद्मश्रीपूर्वीही भिकल्या धिंडांना अनेक सन्मान मिळाले आहेत. नवीन पिढीला तारपा शिकवून ही कला लुप्त होऊ नये यासाठी आयुष्य खर्ची घातले. 'माझा तारपा हीच माझी देवता'असे ते मानतात.पद्मश्री मिळाल्यानंतरही भिकल्या धिंडा आणि त्यांचे कुटुंब अतिशय गरीबीत जीवन जगत आहेत. एकर आठ गुंठे जमीन आणि वृद्ध कलावंत योजनेचे महिन्याला ५ हजार रुपये हेच त्यांचे साधन. वर्षभरापूर्वी त्यांना पक्षाघाताचा झटका आला तरीही ते कार्यक्रमांमध्ये तारपा वाजवत आहेत.भिकल्या धिंडांना मिळालेला पद्मश्री हा केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर पिढ्यान्पिढ्या जपल्या गेलेल्या आदिवासी लोककलेचा सन्मान आहे.रानात गुरे चारताना लागलेला नाद ते थेट राष्ट्रपतींच्या हस्ते मिळालेल्या पद्मश्रीपर्यंत – भिकल्या धिंडांची जीवनगाथा ही कलेप्रती निष्ठा आणि परंपरा जपण्याच्या जिद्दीची प्रेरणादायी कथा आहे.

**– सुदाम भाऊसाहेब शिंदे**
वैजापूर,जि. छत्रपती संभाजीनगर

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीत ट्विस्ट, महाविकास आघाडीत बिघाडी; अंबादास दानवे चक्क महायुतीच्या पॅनलमध्ये!

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांनी बँकेची सत्ता आणि तिजोरीच्या चाव्या आपल्या हाती ठेवण्यासाठी सगळी शक्ती पणाला ल ावली आहे. मुलगा समीर सत्तार याच्यासह पाच संचालक बिनविरोध निवडून आणत सत्तार यांनी अर्धी बाजी मारली आहे. भाजपचे दोन आणि काँग्रेस पक्षाचा एक असे आठ संचालक बिनविरोध निवडून आले आहेत. हे सगळे सत्तार समर्थक असल्याचे बोलले जाते. यात आता आणखी मोठा ट्विस्ट आला असून महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे चित्र आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आणि बँकेचे माजी संचालक अंबादास दानवे हे चक्क महायुतीच्या पॅनलमधून संचालक पदाची निवडणूक लढवत आहे. महाविकास आघाडीसाठी हा मोठा धक्का मानला जात असला तरी ही खेळी सत्तार-दानवे यांच्या समृद्धी महामार्गावर झालेल्या गळा भेटीतच ठरली होती हे आता स्पष्ट झाले आहे. अब्दुल सत्तार यांनी कुठल्याही परिस्थिती जिल्हा बँक आपल्याच ताब्यात ठेवण्यासाठी जोरदार हालचाल ी सुरू केल्या होत्या. भाजपचे मंत्री अतुल सावे यांच्याकडून जिल्हा बँकेत आव्हान दिले जाणार हे लक्षात येताच सत्तार यांनी विधान परिषद निवडणुकीत दबावतंत्र वापरले.

जालना-छत्रपती संभाजीनगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील भाजप महायुतीचे सुहास शिरसाट यांच्याविरोधात मुलगा समीर सत्तार याला उमेदवारी दाखल करायला लावली. सत्तार यांचा विधान परिषद निवडणुकीतील फोडाफोडीचा दांडगा अनुभव पाहता दगाफटका होऊ शकतो याचा अंदाज भाजपच्या नेत्यांना आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या चर्चेनंतर जिल्हा बँकेत सत्तार यांना मदत करण्याचा शब्द दिल्यानंतरच त्यांनी विधानपरिषदेत माघार मान्य केली. सुहास शिरसाट विना अडथळा निवडून आल्यानंतर आता अब्दुल सत्तार यांनी जिल्हा बँकेत आपल्याला हवे तसे फासे टाकत अधिकाधिक संचालक आपल्या बाजूने कसे येतील? असे प्रयत्न सुरू केले आहेत.



सत्तार यांच्या याच खेळीचा भाग म्हणून आमदार अंबादास दानवे यांचे महाविकास आघाडीच्या पॅनल ऐवजी महायुतीकडून ल ढण्याच्या निर्णयाकडे पाहिले जात आहे. गेल्या महिन्यात अंबादास दानवे आणि अब्दुल सत्तार यांची समृद्धी महामार्गावर भेट झाली होती. दोघांनी एकमेकांची भेट घेतल्यानंतर सत्तार यांनी मुंबईत भेटू, जिल्हा बँकेचा विषय असल्याचे म्हटले होते. त्यानुसार या दोघांची मुंबईत भेट झाल ी होती, त्याच वेळी अंबादास दानवे यांनी महायुतीच्या पॅनलमधून लढावे, असे ठरले होते. त्यानूसार आता प्रत्यक्षात तेच घडताना दिसत आहे.

या निर्णयामुळे जिल्ह्याच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. बिगरशेती संस्था मतदारसंघातून दानवे उमेदवारी करत असून, त्यांच्या प्रवेशासाठी महायुतीचे उमेदवार विशाल कदम यांनी माघार घेतल्याची माहिती आहे. मात्र, हा निर्णय पक्षीय राजकारणाशी संबंधित नसून सहकार क्षेत्रातील विकासासाठी नितीन पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी घेतल्याचे दानवे यांनी स्पष्ट केले. जिल्हा बँकेच्या १२ जागांसाठी महायुती आणि महाविकास आघाडीत थेट लढत होत आहे.

अंबादास दानवे औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीऐवजी महायुतीकडून लढणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी विधीमंडळात माध्यमांशी बोलताना जर त्यांनी असा निर्णय घेतला असले तर मी त्यांना थेट महायुतीत म्हणजेच आमच्याकडे या, अशी ऑफर देईल, असे म्हटले आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत ते महायुतीकडून लढत आहेत हे मला तुमच्याकडून समजते आहे. हे खरे असेल तर मी सभागृहात त्यांना विचारेल आणि आता आमच्याकडेच या असे सांगेल. अंबादास दानवे मोठे नेते आहेत, आम्ही त्यांचे महायुतीत निश्चित स्वागत करू, असे शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे.

# संत एकनाथ महाराज पालखी सोहळा : वारकऱ्यांसाठी सर्व विभागाकडून सुविधांची सज्जता- अपर जिल्हाधिकारी डॉ.संभाजी अडकूणे

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- येत्या ७ जुलै रोजी पैठण येथून संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे प्रस्थान पंढरपूर कडे होणार आहे. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सुरक्षितता ,आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी डॉ. संभाजी अडकुणे यांनी दिले .

पैठण येथील नाथ मंदिर परिसरातील सभागृहात पालखी सोहळ्याच्या नियोजनाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पैठण-फुलंब्री विभागाच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसील दार ज्योती पवार, गटविकास अधिकारी श्रीमती मनोरमा गायकवाड, नगरपालिका मुख्याधिकारी श्रीमती अंभोरे , जिल्हा साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका लांडगे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. आर. बी. ढोले तालुका वैद्यकीय अधिकारी पी एम जाधव, सहायक पोलीस निरीक्षक श्री शेडगे, जलसंधारण, महावितरणचे अधिकारी, संत एकनाथ महाराज संस्थानचे कार्यकारी विश्वस्त श्री. बाजीराव बारे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

पालखी मार्गावरील विविध ठिकाणी सोयी-सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. छत्रपती संभाजीनगर बीड, धाराशिव मार्गे पंढरपूर कडे वारकरी पायी जातात. यात वारकरी मोठ्या संख्येने पायी प्रवास करीत असल्याने सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पालखी सोहळा

सुरळीत पार पार पाडण्यासाठी प्रत्येक विभागाने 'नोडल अधिकारी' नेमण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यात नियुक्त संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक पालखी सोहळ्याच्या व्यवस्थापकांना त्वरित उपलब्ध करून दिले जातील, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित संपर्क साधता येईल.

पालखीसोबत वैद्यकीय पथक, आवश्यक औषधे आणि इंजेक्शनचा साठा उपलब्ध ठेव्यात यावा असे निर्देश देण्यात आले.

वारकऱ्यांसाठी फिरत्या शौचालयांची व्यवस्था केली जाणार असून, महिला वारकऱ्यांसाठी स्वतंत्र स्नानगृहांची सोय उपलब्ध करून दिली जाईल.



पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासह, महावितरण विभागाला दिंडीच्या ज्या ठिकाणी मुक्काम असणार त्या गावातील भार नियमन त्या रात्री न ठेवता वीजपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले.

पालखी सोहळ्यातील स्वयंपाकासाठी लागणाऱ्या गॅस आणि डिझेलच्या पुरवठ्यासाठी विशेष काळजी घेण्यात यावी असे निर्देश पुरवठा विभागास देण्यात आले.पावसाळ्याचा विचार करता मार्गावर वॉटरप्रूफ मंडपांची व्यवस्था करण्यात येणार आहे. वारकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सर्व विभागाने समन्वय साधून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकूणे यांनी दिले.

# 'जागर समतेचा...'मधून राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा जागर

## आज छत्रपती संभाजीनगर येथे विशेष सांस्कृतिक कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'जागर समतेचा...' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. सामाजिक समता, बंधुता आणि लोकजागृतीचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमातून राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी विचारांना सांस्कृतिक अभिवादन करण्यात येणार आहे. राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक युगपुरुष म्हणून ओळखले जातात. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक न्यायाची अंमलबजावणी, मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य आणि समतेच्या मूल्यांप्रती त्यांची असलेली बांधिलकी यामुळे त्यांनी समाजजीवनाला नवी दिशा दिली. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा जागर नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'जागर समतेचा...' हा कार्यक्रम लोकशाहिरी, लोकसंगीत आणि प्रबोधनपर कल ासादरीकरणांच्या माध्यमातून सामाजिक समतेचा संदेश प्रभावीपणे मांडणार आहे. महाराष्ट्राच्या लोककलांमध्ये दडलेल्या परिवर्तनवादी परंपरेचा परिचय घडवून देत हा कार्यक्रम सामाजिक सलोखा आणि बंधुभावाची भावना दृढ करण्याचा प्रयत्न करणार आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध लोककलावंत शाहीर राजा कांबळे,शाहीर अजिंक्य लिंगायत आणि त्यांचे सहकल ाकार सहभागी होणार आहेत. आपल्या प्रभावी शाहिरी शैलीतून ते राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची, सामाजिक न्यायाच्या चळवळीची आणि समतेच्या विचारांची मांडणी करणार आहेत. त्यांच्या सादरीकरणातून लोककलांच्या सामर्थ्याचा आणि सामाजिक संदेशाचा अनुभव रसिकांना घेता येणार आहे.

महाराष्ट्रातील शाहिरी परंपरा ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम राहिली आहे. जनसामान्यांपर्यंत विचार पोहोचविण्याची ताकद असलेल्या या परंपरेतून समतेचा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्याचे कार्य सातत्याने होत आले आहे. 'जागर समतेचा...' हा कार्यक्रम त्या समृद्ध परंपरेचा वारसा पुढे नेणारा ठरणार आहे.कार्यक्रमामध्ये लोकसंगीत, शाहिरी गायन आणि सामाजिक आशय असलेल्या सादरीकरणांचा समावेश असून राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव तसेच त्यांच्या विचारांची समकालीन संदर्भात मांडणी करण्यात येणार आहे. सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाचा सांस्कृतिक अनुभव देणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. सदर कार्यक्रम मा. ॲड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे, अभिजात कला, ल ोककला आणि थोर कलावंतांचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक समता, शिक्षण आणि लोककल्याणाच्या विचारांना अभिवादन करणारा हा सांस्कृतिक कार्यक्रम रसिकांसाठी एक आगळावेगळा अनुभव ठरणार आहे. लोकशाहीरांच्या प्रभावी सादरीकरणातून समतेचा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे. सदर कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून कला रसिक, विद्यार्थी, संशोधक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

# मराठा- कुणबी जात प्रमाणपत्र व पडताळणी प्रमाणपत्र मुदतीत द्या; प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करा –प्रभारी आयुक्त खुशालसिंह परदेशी

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण उपसमितीने दिलेल्या विविध सूचनांनुसार विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्रे निर्धारित मुदतीत वितरित करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच प्रलंबित प्रकरणांवर नियमानुसार कार्यवाही करून त्यांचा तातडीने निपटारा करावा, असे निर्देश प्रभारी आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांमधील मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या कामकाजाचा आढावा श्री. परदेशी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला.



यावेळी अपर आयुक्त मंजुषा मिसकर व तहसीलदार के. के. भदाणे उपस्थित होते. तसेच सर्व जिल्ह्यांतील जात पडताळणी समितीचे अध्यक्ष, उपविभागीय अधिकारी आणि संबंधित तहसीलदार ऑनलाइन माध्यमातून बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र व पडताळणीसाठी प्राप्त अर्ज, निकाली काढलेले अर्ज, अवैध अर्ज तसेच प्रलंबित अर्जांची कारणांसह माहिती सादर करण्यात आली. यावेळी बोलताना श्री. परदेशी म्हणाले की, मराठा आरक्षण उपसमितीने मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत विविध सूचना केल्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यांनी शासनाच्या नियमानुसार जल दगतीने कार्यवाही करून आवश्यक अहवाल लवकरात लवकर सादर करावेत. हे अहवाल शिंदे समितीसमोर मांडण्यात येणार आहेत.तसेच कोणताही अर्ज ९० दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. सध्या ९० दिवसांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा नियमानुसार तातडीने निपटारा करण्यावरही त्यांनी भर दिला. अपर आयुक्त मंजुषा मिसकर यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना प्राप्त अर्जांवर वेळेत कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अवैध ठरविण्यात आलेल्या अर्जांबाबत स्पष्ट कारणे नमूद करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# पडेगाव फायरिंग रेंज परिसरात गोळीबार सराव

**छत्रपती संभाजीनगर** - ग्रामीण पोलीस आस्थापनेवरील अधिकारी यांचा गोळीबार सराव बुधवार दि.२५जून २०२६ते १८ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान पडेगांव फायरबट येथे होणार आहे. या काल ावधीत पडेगांव फायरींग बट हद्दीतील नागरिकांनी सतर्क रहावे,असे आवाहन राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) यांनी केले आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शिक्षण, रोजगार आरोग्य सुविधासाठी विविध योजनाद्वारे लाभ मिळवून द्यावेत-ॲड. नीलेश हेलोंढे पाटील

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी विविध विभागामार्फत मदत करावी. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील सदस्यांना शिक्षण रोजगार आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंढे पाटील यांनी आज दिले.



पैठण तहसील कार्यालयात आयोजित बैठकीस पैठण-फुल ंब्री विभागाच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, गटविकास अधिकारी श्रीमती मनोरमा गायकवाड, नगरपालि का मुख्याधिकारी श्रीमती अंभोरे , तालुका कृषी अधिकारी विकास पाटील, यांच्यासह पोलि स व संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील गरजूंपर्यंत लाभ पोहोचवण्यासाठी स्वर्गीय गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनाची जनजागृती करावी .एक हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या कुटुंबात आत्महत्यांचे प्रमाण जास्त दिसून येत आहे. यावर सूक्ष्म निरीक्षण आणि नियोजन करून, सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी योजना कुटुंबांपर्यंत सक्रियपणे पोहोचवाव्यात, तसेच कृषी विभागामार्फत डीबीटी योजनेचा लाभ आणि त्याबाबतची जागृती सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात यावा असे निर्देश मिशन चे अध्यक्ष हे लोंढे पाटील यांनी विविध विभागांना दिले.

आरोग्य विभागाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना जास्तीत जास्त विनामूल्य वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात पुढाकार घ्यावा. त्यांना धर्मादाय (चॅरिटेबल) रुग्णाल यात उपचारांसाठी मार्गदर्शन करावे .

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना वारंवार भेटी देऊन त्यांना सरकारी योजनांची माहिती देणे आणि पात्र कुटुंबांना या योजनांचा लाभ मिळवून देणे, हे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे सांगत, त्यादृष्टीने प्रयत्न करावेत.

पशुसंवर्धन विभागामार्फत शासकीय गायरान जमिनीवर चारा लागवड करून, लहान शेतकऱ्यांचे शेतीपूरक व्यवसाय वाढवण्यासाठी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. याशिवाय, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील ० ते १८ वयोगटातील मुलांच्या शिक्षणाचा व भविष्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले योजने'चा लाभ मिळवून द्यावा. असे आवाहन शिक्षण विभागाच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे याची अंमल बजावणी करण्याचे निर्देश मिशनचे अध्यक्ष ॲड .निलेश हेलोंढे पाटील यांनी दिले.

(पान १ वरुन)

## नसरापूर अत्याचार प्रकरणात..

सिद्ध झाले, असे न्यायाधीश एस. आर. साळुंके यांनी स्पष्ट केले. 'या प्रकरणातील पुरावे सबळ आणि ठोस आहेत. आरोपी कांबळेच्या बचावातील मुद्दे ग्राह्य धरता येत नाही, असे मिसर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

आरोपी भीमराव कांबळे याने न्यायालयात बचाव केला. 'घटनेच्या दिवशी घायवळ यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये गेलो होतो. तेथे बालिका आली होती. तिला गाठी शेव खाण्यास दिली. गोठ्याकडे नेत असताना बालिकेचा पाय घसरला. तिच्या डोक्याला मार लागला. ती रडू लागली. तिला खाटेवर झोपवून तेथून गेलो', असा बचाव कांबळे याने न्यायालयात केला होता. वैद्यकीय पुरावे, घटनास्थळावरील पुरावे, साक्षीदारांची साक्ष या बाबी विचारात घेऊन न्यायालयाने कांबळे याचा बचाव फेटाळून लावला होता. 'पीडित बालिकेच्या शरीरावर १८ गंभीर जखमा आढळून आल्या होत्या. आरोपीने बालिकेवर अत्याचाार करुन तिचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले. यापूर्वी त्याने दोन महिलांवर अत्याचर केल्याचे प्रकार नोंद आहेत', असे सरकारी वकील मिसर यांनी युक्तिवादात सांगितले.

गुन्हा शाबीत करण्यासाठी पोलिसांनी दिलेले पुरावे हे परिस्थितीजन्य आहे. आरोपी हा गुन्हेगार आहे, हे सिद्ध करणारी घटनेची साखळी उलगडण्यात आली नाही. त्याला पुरक पुरावे सादर करण्यात आले नाहीत. हा गुन्हा दुर्मिळातील दुर्मिळ नाही, असे बचाव पक्षाचे वकील ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी युक्तिवादात सांगितले.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता शहर विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून औद्योगिक ग्राहकांच्या मीटर वाचनासाठी निविदा क्र. ०६,०७,०८ आणि ०९ क्रमांकाद्वारे दि.२६.०६.२०२६ ते ०८.०७.२०२६ पर्यंत मागविण्यात येत आहे. कामासबंधीचा सविस्तर तपशील https://etender.mahadiscom.in/eatApp/latestTendersWorks# या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पीआरओ क्र.AZ ७९/२०२६

**कार्यकारी अभियंता, शहर विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर**